# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

९ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४००००५

## जाहीर सूचना

दूरध्वनी : ०२२-२२१५२२१५, ०२२१५२०१९

Email : mwrra@mwrra.in

२०१४ या तुटीच्या वर्षात ऊर्ध्व गोदावरी उपखो-यातील वरील भागात असलेल्या जलाशयांमधून पाणी सोडून जायकवाडी या जलाशयाला समन्यायी पाणी वाटपाचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने श्री. प्रशांत बन्सीलाल बंब्र, वि.स.स. यांनी जानेवारी २०१४ मध्ये आणि मराठवाडा विकास प्रतिष्ठान, औरंगाबादच्या श्री. या.रा. जाधव यांनी एप्रिल २०१४ मध्ये दाखल केलेल्या याचिकांवर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने सुनावणी घेऊन दिनांक १९ सप्टेंबर २०१४ च्या आदेशान्वये निर्णय दिला होता.

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे प्राधिकरणाच्या वर नमूद केलेल्या आदेशाविरुध्द त्या निर्णयामुळे बाधित झालेल्यांनी अपील दाखल केले होते. मा. उच्च न्यायालयाने दिनांक २३ सप्टेंबर २०१६ च्या न्यायपत्राव्दारे दिलेल्या निर्देशातील परि. १९५ ( xi ) नुसार प्राधिकरणाच्या दि. १९ सप्टेंबर २०१४ च्या निर्णयातील तत्वांचे (Principles) पुनर्विलोकन प्रक्रिया सुरु केली आहे. आदेशातील तत्वांचे (Principles) पुनर्विलोकन करण्यापूर्वी आधारभूत तपशीलाचे (डाटा) पुनर्विलोकन करण्यात येणार आहे.

गोदावरी अभ्यास गटाचा अहवाल प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर<www.mwrra.org> ठेवलेला आहे. त्या अहवालामध्ये वापरलेल्या तपशील / आधारसामग्रीबद्दल - विशेषत: अहवालातील खंड १ परि. २ व ३, अहवालातील विवरणपत्रे १ ते ११ आणि परिशिष्टे १ ते ७ इत्यादीबाबत - काही आक्षेप असल्यास दिनांक ३० एप्रिल २०१८ पर्यत लेखी स्वरुपात किंवा Email द्वारे प्राधिकरणाकडे पाठवावेत.

(डॉ. सुरेश कुलकर्णी)
सचिव